


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ४४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२७ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा; २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** सुपर एल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने बहुतांश जिल्ह्यांमध्ये भीषण दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर करून बळीराजाला दिलासा देण्याची मागणी जोर धरत होती. अखेर आज सरकारने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यात जूनपासून आतापर्यंतच्या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचं कृषी आयुक्तांच्या अहवालावरून दिसून येत आहे. सदर २६५ तालुक्यांमध्ये Trigger-1 लागू असल्यामुळे तिथे पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरू करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पीक परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

**सरकारकडून कोणकोणत्या सवलती लागू करण्याचा निर्णय?**

एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त



भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट
२) पीक कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे
९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे
१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे
११) जलसंधारणाची कामे सुरु करणे
१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

दरम्यान, सदर २६५ तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपद्धतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाणार आहे.

### कोणत्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर, जाणून घ्या संपूर्ण यादी...

श्रीवर्धन, रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला, मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर, एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी, नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता, भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर, पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री, बदनापूर, घनसावंगी अंबड, जालना परतूर, मंठा भोकरदन, जाफ्राबाद, बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी, लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट, धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा, नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव, पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी, हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत, जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा, अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर, अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी, वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा मानोरा, यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मरेगाव, झरी जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव, वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी, नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर, भंडारा, पवनी, लाखंदूर, तिरोडा, चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजूरा कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, गडचिरोली, चार्मोर्शी

# अहिल्यानगर जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट गडद !

## पावसाअभावी खरीप हंगाम कोरडा; कुटुंबाचा खर्च भागवायचा कसा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** पावसाच्या भरवशावर वर्षभराचे गणित मांडणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा निसर्गाने शेतकऱ्यांची मोठी परीक्षा घेतली आहे. जून-जुलैमध्ये समाधानकारक पाऊस झाल्याने शिवारात उभ्या राहिलेल्या खरीप पिकांकडे पाहून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, ऐन पीकवाढीच्या काळात पावसाने दीर्घ दडी मारल्याने ही आशा आता निराशेत बदलली आहे. खरीप हंगाम जवळपास हातातून गेल्याचे चित्र असताना आता प्रश्न केवळ आजच्या पिकाचा राहिलेला नाही; तर उद्याच्या पाण्याचा, चाऱ्याचा, रब्बी हंगामाचा आणि शेतकरी कुटुंबाच्या अर्थकारणाचा झाला आहे.

जिल्हा प्रशासनाने सप्टेंबरच्या मध्यातच दुष्काळसदृश परिस्थितीचे प्राथमिक संकेत स्पष्ट केले होते. ऑगस्टमध्ये सरासरीच्या केवळ २६ टक्के पाऊस झाला असून पावसाच्या दीर्घ खंडाचा खरीप पिकांना मोठा फटका बसल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. मुळा धरणात पाणीसाठा झाला मात्र, उर्वरित मध्यम सिंचन प्रकल्पांमध्ये अवघा ८ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे नियोजनही चिंतेचा विषय बनले आहे.

अहिल्यानगरच्या अनेक भागांत आजही सोयाबीनचे पीक वरून हिरवे दिसत असले तरी त्यामागची वस्तुस्थिती वेदनादायी आहे. पावसाअभावी शेंगा लागण्यावर आणि दाणे भरण्यावर परिणाम झाला आहे. जिल्हा प्रशासनाच्या बैठकीत कृषी तज्ज्ञांनीही काही ठिकाणी सोयाबीनचा दाणा बारीक राहिल्याचे



निदर्शनास आणले होते.

पारनेर तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागांत पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे वृत्त समोर आले आहे. काही भागांत शेतकरी पंचनामे आणि मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

पावसाने पाठ फिरवल्याने यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून निसटला, पण संकटाची खरी व्याप्ती पुढील काही महिन्यांत जाणवणार आहे. शेतकऱ्यांच्या घरातील धान्य, जनावरांच्या गोठ्यातील चारा, विहिरीतील पाणी आणि रब्बीच्या पेरणीसाठी उपलब्ध असणारे पाणी या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाला शोधावे लागणार आहे. पारनेर तालुक्यासह जिल्ह्याच्या शिवारात आज करपलेल्या पिकांकडे पाहताना शेतकऱ्यांच्या डोळ्यात एकच प्रश्न आहे. यंदाचे गेले पण उद्याचे कसे? ही केवळ एका हंगामाची हानी नाही. ही हजारो शेतकरी कुटुंबाची पुढील काही महिन्यांच्या जगण्याची चिंता आहे.

त्यामुळे मदत केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर आणि खात्यावर कधी पोहचते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**● मदतीच्या घोषणेची आता प्रतीक्षा...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून जिल्हाधिकाऱ्यांना ५ ऑक्टोबरपासून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले आहेत. पीक नुकसान, पीकविमा, चारा, पिण्याचे पाणी आणि आर्थिक मदतीबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. मदतीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला जाईल

**● आज पिकाची चिंता; उद्या पाण्याची धास्ती...**

खरीप हंगामाच्या नुकसानी नंतर सर्वात मोठे आव्हान म्हणजे पिण्याचे पाणी आणि जनावरांचा चारा. पावसाची तूट आणि कमी झालेला जलसाठा पाहता प्रशासनाने आतापासूनच टँकरचे नियोजन, चाऱ्याची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. पावसाचे पुनरागमन झाले असले तरी उशिराचा हा पाऊस वाया गेलेल्या सोयाबीनसारख्या खरीप पिकांना फारसा आधार देऊ शकणार नाही, तर काही दीर्घकालीन पिकांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे.

**● शेतकऱ्याच्या हातात आता काय?...**

खरीप पिकावर केलेला खर्च, बियाणे, खत, औषधे, मशागत आणि मजुरी या सर्वांचा हिशेब शेतकऱ्यांपुढे उभा आहे. उत्पादन हातचे गेले तर कर्जाचा हप्ता कसा भरायचा, पुढील हंगामाची पेरणी कशी करायची आणि कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

# मराठी कवितेचा शंभरावा साहित्यिक सोहळा; पुण्यात रंगणार राज्यस्तरीय काव्यसंमेलन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२६, सोलापूर :** मराठी साहित्य, कविता आणि काव्यपरंपरेला समृद्ध करणारे १०० वे राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलन २०२६ रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी पुण्यात आयोजित करण्यात आले आहे. रानकवी प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य आणि ज्ञानाई फाउंडेशन कला साहित्य विचार मंच, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्यिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'निसर्गकवी ना.धो.महानोर साहित्य नगरी' अशी संकल्पना असलेल्या या संमेलनाचे आयोजन महात्मा फुले सांस्कृतिक भवन, फातिमानगर, वानवडी, पुणे येथे सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या निमित्ताने कविसंमेलन, पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला असून राज्यभरातील साहित्यिक, कवी आणि रसिकांची उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाऊसाहेब भोईर यांची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उल्हास दादा पवार आणि मेघराज राजेभोसले उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या आयोजनात रानकवी जगदीश भुजंगराव वनशिव, तसेच लोककवी मा. सीताराम चव्हाणराव नरके यांची प्रमुख भूमिका आहे. तसेच मा. राहुल रामचंद्र जाधव हे सहआयोजक असून मा. महेश दादा पुंडे हे सहकार्य करीत आहेत.

**कविता, साहित्य आणि पुरस्कारांचा संगम**

१०० व्या राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलनाच्या निमित्ताने साहित्यप्रेमींना काव्यवाचनाचा आनंद मिळणार असून विविध साहित्यिक उपक्रमांसोबत पुस्तक प्रकाशन आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिकांचा पुरस्कार वितरण सोहळाही पार पडणार आहे. मराठी भाषा, साहित्य आणि काव्यसंस्कृतीच्या संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनामुळे राज्यातील कवी, साहित्यिक आणि रसिकांना एकत्र येण्याची संधी मिळणार आहे. शंभराव्या संमेलनाचा ऐतिहासिक टप्पा गाठत पुण्याच्या साहित्यिक वातावरणात या सोहळ्याची विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे. कवितेसाठी... कधीही... कुठेही... या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या साहित्यिक पर्वाला साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील १२ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** पावसाची अनिश्चितता, पिकांची चिंताजनक स्थिती आणि वाढत्या आर्थिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुष्काळाचे सावट गडद झाले होते. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांची होत असलेली ससेहोलपट लक्षात घेऊन चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेली आग्रही मागणी अवघ्या काही तासांत निर्णयात रूपांतरित झाली आहे. खरीप २०२६ मधील (ढऑळससशऑ-१) ट्रीगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार असून, यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिपरी, राजुरा, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभीड, सिंदेवाही आणि पोंभूर्णा या १२ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता वेळीच शासन-प्रशासनाच्या निदर्शनास आणून तातडीने निर्णयासाठी केलेल्या आ. मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या भूमिकेबद्दल जिल्ह्यातून आभार व्यक्त होत आहेत.

बल्लारपूर, ब्रह्मपुरी आणि जिवती या तीन तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश झालेला नाही. या तीन तालुक्यांनाही दुष्काळी सवलतींचा लाभ मिळावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार येत्या २८ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असून, या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यासाठी ठोसपणे पाठपुरावा करणार आहेत. दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीला तातडीने प्रतिसाद; चंद्रपूर जिल्ह्यात निर्णय झाल्याने आ. सुधीर मुनगंटीवार यांचे नागरिकांकडून आभार मानले आहे.

२५ सप्टेंबर रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पिकांची स्थिती, पावसाची परिस्थिती आणि शेतकऱ्यांवर आलेला वाढता आर्थिक ताण लक्षात घेऊन जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी केली होती. यासंदर्भात महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर उभ्या ठाकलेल्या अडचणी आणि परिस्थितीचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

शेतकऱ्यांची अडचण अधिक तीव्र होण्याची वाट न पाहता परिस्थितीचे गांभीर्य वेळीच शासनाच्या निदर्शनास आणून त्यावर तातडीने निर्णय व्हावा, यासाठी आ.मुनगंटीवार यांनी प्रशासनाच्या विविध स्तरांवर ठामपणे पाठपुरावा केला होता. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शासनाच्या निर्णयामुळे विविध सवलतींचा लाभ मिळणार आहे. कृषीपंपांच्या वीजबिलात, विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सूट देण्यात येणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त कुटुंबांवरील आर्थिक भार काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात मागणी करून थांबण्याऐवजी तिचा तातडीने पाठपुरावा करून निर्णयापर्यंत नेण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांची भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे. दुष्काळग्रस्त यादीत समावेश न झालेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, जिवती, ब्रह्मपुरी तालुक्यांतील शेतकऱ्यांनाही मदत मिळावी, यासाठी पुढील पाठपुरावा करण्यासाठीही आ. मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे.




## 'गुगल' गुरू चा वाढदिवस




आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले.

गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो.

७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

# दिलखुष कचोरी व चाट !!

गणेशोत्सवाची धामधूम संपली. आता सर्वांनाच थोडीशी नवरात्रीच्या वेळेपर्यंत थोडीशी विश्रांती असते. इतकेदिवस गौरी, गणपती यांच्या गडबडीत नाश्ता, मधल्यावेळचे खाणे तसे झटपट जसे जमेल तसेंच करणे जमते. पण आता या थोड्याश्या ब्रेकमध्ये थोडी स्वतःची पण आवड जपूया ना? त्यासाठीच आज एक खास वेगळा कचोरीचा प्रकार बनवूया.



कचोरी हा सर्वांचाच लाडका स्नॅक्सचा प्रकार आहे . यात सुद्धा अनेक प्रकारच्या कचोऱ्या बनवल्या जातात. काही गरम गरम खाऊन आनंद देणाऱ्या तर काही सुक्या मसालेदार, भरपूर दिवस छान टिकणाऱ्या, काही मुगाच्या, मटारच्या, बटाट्याच्या तर काही खव्याच्या, अगदी उपवासाच्यासुद्धा बनवल्या जातात. एकूण या कशाही बनवल्या तरी सर्वांना तितक्याच मनापासून आवडतात.

आपण नाश्त्यासाठी बरेचदा रव्याचा उपमा बनवतो, विशेषत: घरात काही कार्यक्रम असला की हा बनवला जातोच पण काही वेळा काही कारणामुळे थोडा शिल्लक राहतो. पुन्हा दुसऱ्या दिवशी तोच खायला कोणी तयार नसते आणि तो वाया घालवणे पण नको वाटते. अशावेळी या कचोऱ्या बनवून पहा, कोणाला समजणार पण नाहीत, या कशाच्या बनवल्या आहेत इतक्या सुरेख आणि खुसखुशीत टेस्टी कचोऱ्या!

मटारच्या सिझनमधे सुंदर हिरवीगार मटार सर्वत्र मिळतातच, पण आता एरवीसुद्धा फ्रोझन मटार बरेच लोक घरात बनवून ठेवतात किंवा शॉप्समध्येही सहज उपलब्ध असतात. म्हणून तीचे स्टफींग बनवूनआज एक इंटरेस्टिंग आणि मजेची थोडीशी वेगळी अशी कचोरी बनवू आणि सर्वांना खुश करू.

**साहित्य :**

१ वाटी मटार दाणे, २ चमचे भाजलेले बेसन, अर्धा चमचा आमचूर पावडर, १ चमचा साखर, १ चमचा आले लसूण ठेचा, १ वाटी कोथिंबीर, १ चमचा अर्धे कुटलेले धने, १ चमचा कसुरी मेथी, अर्धा चमचा बडीशेप, चवीनुसार मीठ, हळद, दिड चमचा लाल तिखट.. आवडीनुसार कमी जास्त घालावे, ३..४ वाट्या उपमा, तेल.

**कृती :**

प्रथम मिक्सर मधून मटार दाणे जाडसर वाटून घ्यावेत. मग गॅसवर कढई ठेवून त्यात २ चमचे तेल घालून ते गरम झाले की त्यात आधी बडीशेप आणि धण्याची जाडसर पावडर घालून लगेंच त्यात आले लसूण यांचा ठेचा घालून व्यवस्थीत एकत्र करावे. नंतर हळद, घालून बेसन व कोथिंबीर घालावी व व्यवस्थीत खमंग होईपर्यंत मस्त परतावी. आता त्यात क्रश केलेले मटार, आमचूर पावडर, कसुरीमेथी साखर, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घालून मस्त फ्राय करावे. छान सारण तयार करून थंड करण्यास ठेवावे.

त्यानंतर उपमा एका मोठ्या बाऊल मध्ये काढून घ्यावा. त्यातील कढीपत्ता असेल तर काढून टाकावा म्हणजे कचोरीची वरची पारी सहज व व्यवस्थितपणे करता येईल. हा उपमा छान मळून सॉफ्ट करून गोळा बनवावा.

सारण थंड झाल्यावर उपम्याचे छोटे छोटे बॉल्स बनवून त्याच्या पारी बनवाव्यात आणि त्यात मटार घालून बनवलेले सारण भरावे आणि बॉल छान बंद करून ठेवावेत.

पुन्हा गॅसवर कढई ठेवून त्यात कचोऱ्या तळण्यासाठी तेल घालावे. एरवी कचोरी तळताना आपण गॅसवर कढई ठेवून त्यात तेल घातले की लगेंच तेल थंड असतानाच तेलामध्ये कचोऱ्या सोडतो त्यामुळे कचोऱ्या कडक बनतात. कारण त्या मैद्याच्या बनवलेल्या असतात. पण या कचोऱ्या रव्याच्या आणि त्याही छान उपमा बनेपर्यंत वाफवलेला असल्यामुळें या खूपच खुसखुशीत बनतात. या तळण्यापूर्वी तेल गरम करून त्यात चिमूटभर फ्रायपावडर घालावी त्यामुळे तेल हलके होते आणि तळण्यासाठी हे कमी लागते. तसेही उपमा करताना त्यात घातलेले असतेच त्यामुळे कमीच लागते या कचोऱ्या तळायला. मग त्या गरम झालेल्या तेलात कचोऱ्या मस्त खुसखुशीत होऊन तांबूस रंगावर तळून तारेच्या चाळणीत काढाव्यात.

या गरम गरम कचोऱ्या खाताना एकदम दिल खुश होऊन जाते. सोबत केचप , चिंचगूळ खजूराची चटणी, आणि तळलेल्या हिरव्यागार मिरच्या असतील तर मग काही विचारायलाच नको.

**वैशिष्टय:**

या कचोऱ्या इतक्या सुरेख आणि खुसखुशीत बनतात की, पोट भरते पण मन भरत नाही अशी अवस्था होते. उपमा नसेल तर दोन वाटी पाणी उकळत ठेवुन त्यात एक चमचा तेल, किंचित मीठ घालून एक वाटी बारीक रवा घालुन तो गोळा होईपर्यंत परतावे. मग हे खाली काढीन झाकून ठेवावे. थंड झाल्यावर त्याचे गोळे बनवून त्याची पारी बनवून त्यात मटारचे स्टफींग भरून कचोऱ्या बनवाव्या. मटार, उपमा दोन्ही दमदार असल्यामुळे हा पोटभरीचा पदार्थ आहे. उपमा आधीच बनवलेला असल्याने पारीसाठी लागणारा वेळ आणि कष्ट तर वाचतातच पण शिल्लक राहिलेल्या उपम्याचाही इतका सुरेख उपयोग होऊ शकतो आणि कमी वेळात पोटभरीचा टेस्टी गरम गरम सर्वांना आवडेल असा नाश्ता बनतो. कचोरी फोडून त्यात हिरवी, चिंचगुळाची चटणी, गोड बनवलेले दही, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर बारीक शेव घालून वरून चाट मसाला भुरभूरावा. चाट बनवल्यावर तर सर्वजण नक्की तुटून पडतील आणि पाहता पाहता फडशा पडणार हे तर नक्कीच ! उपम्यात हळद नसेल आणि लालसर कचोरी बनवायची असेल तर पारीचा गोळा बनवताना यात थोडी हळद पावडर घालावी. मटार ऐवजी बटाटा, कॉर्न, मुगाची डाळ वापरूनसुद्धा आवडीनुसार कचोऱ्या बनवू शकतो. नक्की करून पहाच.

**सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

# निवडणूक आयोगातील फाटा 'फुट'




गेल्या आठवड्यात गणेशोत्सवाची धामधुम सुरू असतांनाच 'द इंडियन एक्स्प्रेस' या वृत्तपत्राने एक खुलासा केला यामुळे अवघ्या देशात एकच खळबळ माजली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात लोकशाहीचे कसे धिंडवडे निघत आहेत आणि यात खुद्द देशाचा निवडणूक आयोगच कशी भुमिका निभावत आहे याचा खुलासा केला गेला आहे. या खुलाशात निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी गेल्या दहा महिन्यात चौदा वेळा आपली लेखी असहमती दर्शवली,एकाच दिवसात चार वेळा असहमती चे पत्र देऊनही कुठलीच कारवाई केली गेली नाही. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवले मात्र तरी देखील आपली दखल घेतली जात नाही म्हणून त्यांनी केंद्रीय कॅबिनेट सचिव यांच्याकडे तक्रार केली. ऐकूणच निवडणूक आयोगातील तीन सदस्यांमधे सहमती नसल्याचे स्पष्ट झाले. वास्तविक निवडणूक आयोगाचे निर्णय हे सर्व सहमतीने झाले पाहिजे आणि तसे असेल तर बहुमताने झाले पाहिजे हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे, मात्र ज्या पद्धतीने निवडणूक आयोगातील मतभेद चव्हाटय़ावर आले ते पहाता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे एकला चलो रे च्या पद्धतीने निवडणूक आयोगाचा कारभार रेटुन नेत आहेत असेच म्हणावे लागेल. एस आय आर प्रकियेचा बाबत नेमके आयोगाचे निर्णय काय? हे स्पष्ट होत नाही. नवीन मतदार नोंदणी करतांना फॉर्म - ६चा वापर करावा लागतो मात्र एप्रिल २०२६ मधे त्या फॉर्म बरोबर एक प्रतिज्ञा पत्र अनिवार्य करण्यात आले मात्र हे झालेल्या बदलाबाबत दोन्ही आयुक्त अनभिज्ञ दिसतात. गेल्या वर्षी बिहार निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत धिसाघाईने एस आय आर प्रकिया राबवली गेली, त्यानंतर पश्चिम बंगाल मधे देखील एस आय आर प्रकिया रेटुन नेली मात्र त्या अभूतपूर्व गोंधळ झाला अखेर सर्वोच्च न्यायालयाला दखल घ्यावी लागली मात्र तरी देखील सत्तावीस लाख वैध मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागले. जास्तीत जास्त मतदार जोडले जावे हे अपेक्षित असतांना घुसपैठ च्या नावाखाली करोडो नावे वगळली जात आहेत मात्र घुसपैठ किती हे सांगितले जात नाही. गोव्यात तर ९७ मतदारांचा तर राज्य निवडणूक आयोगाने प्रयत्न करूनही मतदार यादीत समावेश होऊ शकला नाही कारण मतदार यादीत कोणाला वगळायचे कोणाचे नाव टाकायचे याचे केंद्रीकरण करून टाकले आहे. राजीव कुमार गेले आणि ज्ञानेश कुमार आले मात्र हे दोघेही आल्यापासून देशाच्या इतिहासात कधी नव्हे एवढे प्रश्नचिन्ह निवडणुक आयोगावर ऊभे ठाकले आहे. ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर चहूबाजूंनी टीका होत असताना केवळ भाजप ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाची पाठराखण करत आहे या देशांमधील 'ये रिश्ता क्या कहलाता है' ? अनेक राज्यांत भाजपने मिळवलेला विजय खुद्द भाजपला देखील अनपेक्षित आहे.हरियाणा, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल बिहार मधील निकाल हे खरोखरच आश्चर्यजनक आहेत.

घटनेच्या कलम ३२४ नुसार घटनाकारांनी देशाच्या निवडणूक आयोगाची निर्मिती केली आणि एक घटनात्मक स्वायत्त संस्था निर्माण केली ती याच ऊद्देशाने कि निवडणूक आयोगाने निष्पक्षपातीपणे, निर्भीडपणे, सर्वांना समान संधी देत निवडणूका पार पाडणे जेणेकरुन देशाच्या लोकशाहीचा आत्मा असलेल्या निवडणूका लोकशाहीला बळकट करतील आणि देशात सद्रढ लोकतंत्र राहिल. मात्र दुर्दैवाने सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी निवडणूक आयोग हा आपल्या सत्ताकारणासाठी वापरला याला अपवाद ठरला तो केवळ कै. टी. एन शेषन यांच्या काळाचा. गेल्या काही वर्षांपासून तर निवडणूक आयोग हा जणु सत्ताधारी पक्षासाठीच काम करत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे आणि ते अनेक निवडणूकांच्या निकालात अधोरेखित झाले आहे. तरी देखील एक स्वायत्त संस्था म्हणून देशातील मतदार निवडणूक आयोगाकडे मोठ्या अपेक्षेने पहात आहेत मात्र आता खुद्द निवडणूक आयोगातच सारे काही आलबेल आहे असे दिसत नाही. काँग्रेसच्या काळात देखील निवडणुक आयोगाचा गैरवापर झाला असेलही मात्र तेव्हा इतके गंभीर प्रश्न कधी निर्माण झाले नव्हते की. आपल्या मर्जीतील निवडणूक आयुक्त नेमले जावेत यासाठी तर मोदी सरकारने तसा कायदा बनवला, त्यासाठी देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेला ठेंगा दाखवला, ज्ञानेश कुमार यांना भाजपसाठी मुक्तपणे काम करता यावे यासाठी देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच विरोधकांना सभागृहाबाहेर काढुन निवडणूक आयुक्तांविरोधात कुठलीही तक्रार किंवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही असा कायदा बनवला, तो का बनवला हे सुज्ञास सांगणे न लागे.

आजवर गेल्या काही वर्षांपासून राहुल गांधी आणि विरोधक याबाबत आवाज ऊठवत होते, निवडणुक आयोगाकडे तक्रार करत होते, पुरावे देत होते मात्र ज्ञानेश कुमार हे कुठलीच दखल घेत नव्हते ते जणू केवळ भाजपसाठीच आपल्या घटनात्मक पदाचा वापर करत आहेत हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. पुरावे द्या अन्यथा कारवाई करु असे सांगणारे ज्ञानेश कुमार यांनी मात्र राहुल गांधी यांच्या विरोधात कुठलीच कारवाई केली नाही. आता देखील ते काही बोलायला तयार नाहीत. आतातर त्यांचे दोन सहकारीच त्यांच्या विरोधात लेखी तक्रार करत आहेत तरी देखील ज्ञानेश कुमार बोलायला तयार नाहीत. आतातर जेन झी देखील त्यांच्या विरोधात मैदानात उतरली आहे कारण नवीन मतदार म्हणून अनेक जेन झी ची नोंदणीचे होऊ शकत नाही.

घटनात्मक संस्थाचे आपले एक महत्व आहे त्यामुळेच त्यांना घटनात्मक दर्जा दिला आहे विशेष अधिकार दिले आहेत, त्या पदावर बसलेल्या व्यक्तींकडुन जबाबदार चाल चलन चरित्र, निर्भीडपणे, सर्वांना समान संधी देत, निर्भीडपणे काम करण्याची अपेक्षा देशातील जनता बाळगते मात्र दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून अशा पदांवर बसणाऱ्यांव्यक्ती या आपल्या पदाला न्याय देतांना दिसत नाही यामुळे अशा संस्थाची विश्वासार्हतता गमावतो चालली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीमुळे देशाच्या निवडणूकाची प्रतिष्ठा खालावत आहे आणि जनतेचा निवडणूक व्यवस्थेवरील विश्वासच ऊडत चालला आहे हे अधिक चिंताजनक आहे. ज्ञानेश कुमार यांनी वैयक्तिक फायदा न पहाता देशहितासाठी आपले कर्तव्य पार पाडावे त्यांनी लोकशाहीचे 'डॅमेज कुमार' होऊ नये.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## रोख

ऑनलाईन जमाना
नोटा कशाला रोख
संशयीत वातावरण
समजू घ्यावा रोख

प्रत्येक प्रश्ना सामोरे
हवे उत्तर रोखठोक
संधी उठवते फायदे
चालणारनोकझोक

काय कसे चाललेयं
विचारत राही लोक
हरेक देवता समोर
म्हणता तोचं श्लोक

पुरावा मागत बसले
सगळे नसे बिनडोक
काळजी पूर्वक करा
व्यवहार बिन धोक

खोटे सहजते पटते
सत्यासआधारचोख
विरोधीगटास सवय
जुनेचच्युईगम चोख

स्पष्टिकरणास्पष्टता
ते शंभर वेळा घोक
भगदाड पडते मोठे
असूनि लहान भोक

हातपाय गाळून बसे
खरे असूनि डरपोक
दारुडेसमजती लोक
परिश्रमे जाता झोक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# यंदाही उंच गणेश मुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच !

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या. ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगमनासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तींची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो. काही मंडळे आपल्या उंच मुर्त्या तराफ्यावरून खोल समुद्रात नेऊन त्यांचे विसर्जन करतात. लालबागच्या राजाचे विसर्जन तर सर्वांचेच डोळे दिपवणारे असते. यंदा मुंबईच्या राजाचे विसर्जन तर अत्यंत राजेशाही पद्धतीत डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. काही मंडळाच्या उंच मुर्त्या मात्र दरवर्षीप्रमाणे याही वर्षी किनाऱ्यावरच उभ्या होत्या. उंच मुर्त्या आणणारे या मुर्त्यांचे खोल समुद्रात विसर्जन का करत नाहीत. मंडळाकडे तेव्हढे कार्यकर्ते नाहीत, किंवा भांडवल नाही तर ही मंडळे उंच मुर्त्या तरी का आणतात ? अनंत चतुर्दशीला अनेक मंडळे बाप्पाच्या चरणाला पाणी लागले की तेथून पळ काढतात. भरती सरल्यावर या उंच मुर्त्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. अशा मूर्त्यांना मग क्रेनच्या आधारे खाली पाडून त्यांना भग्न करावे लागते. ज्या गणेशाच्या नावाने १० दिवस उत्सव साजरा केला जातो त्याचा केव्हढा हा अवमान. गणेशोत्सव हा मौजेचा नव्हे तर श्रद्धेचा उत्सव आहे; मात्र हल्ली आपल्या मंडळाची मूर्ती किती उंच आहे हे दाखवण्याची स्पर्धा मंडळांमध्ये रंगताना पाहायला मिळते ज्यामध्ये श्रद्धेला सोयीस्करपणे तिलांजली दिली जाते. उंच गणेशमूर्त्या किनाऱ्यावर सोडून पळ काढणाऱ्या, त्यांचे योग्य पद्धतीने विसर्जन न करणाऱ्या मंडळांवर खरेतर कारवाई करून त्यांना पुढील वर्षी उंच मूर्ती आणण्यास प्रतिबंध घातला पाहिजे.

**सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२




रामदास ( दिपक ) गुलाब चव्हाण.मु.शेखमिरेवाडी, पो.भोळी, ता.खंडाळा,जि.सातारा यांच्या घरातील गौरी गणपती विराजमान




सूर्यकांत पाटील, (साबेगाव, पोस्ट दिवा, तालुका जिल्हा ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा, आळंदीचा देखावा साकारला आहे.




रमेश विष्णू पाटील, पोलीस पाटील (देसाई गाव, पोस्ट पडले ता.जी.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




मच्छिन्द्रनाथ गणपत पाटील (मु. उत्तरशिव गाव, ता.जि.ठाणे नवी मुंबई ) यांचा घरचा गणपती बाप्पा




संदेश स मढवी आणि शेखर मढवी परिवारातील दहा दिवसाचा गणराया, नवी मुंबई, घणसोली, चिंचाआळी




समीर रोहिदास पाटील प्रणय पाटील व पाटील परिवारातील श्री गणेशा वर्ष ३४, घणसोली गाव, नवी मुंबई, ठाणे




सोहम शेटे आणि शेटे परिवाराचा गणराया वर्ष ४ आई अंबाबाईचा सुंदर देखावा घणसोली गाव, नवी मुंबई, ठाणे.




जोमा पाटील ( कानपोलीगाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड,) यांचा घरचा बाप्पा




बाबुराव गोटीराम वास्कर (मु.शिळगांव, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा




वासुदेव कोंडाजी मुंढे (मु.देसाईगांव, पाटील पाडा पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




पप्पू रामा काठे (शिळगाव पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




श्री. विकास व सौ.करिष्मा भोलनकर, आळंदी देवाची, पुणे यांच्या घरातील गणपती बाप्पा




केशव काशिनाथ पावशे यंदा वर्ष ९२ (पेंधर गाव, पोस्ट तळोजा, तालुका पनवेल जिल्हा रायगड,) यांचा घरचा गणपती बाप्पा




विजलीला सोसायटी चा विघ्नहर्ता, वर्ष ८, उदय दादा पाटील घणसोली गाव, कौल आळी




रतन पाटील, (देसाई गाव, पोस्ट पडले ता.जी.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा

# पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

## सभासदांना १२ टक्के लाभांश देणार



संस्थेचे २३ वर्षांच्या कालावधीत मार्च २०२६ अखेर २५१ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. हे सभासदांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. संस्थेच्या ठेवी मार्च २०२७ अखेर ३०० कोटींचा टप्पा पार करणार असल्याचा विश्वास आहे.

**– सुरेश बोरुडे (व्हा.चेअरमन)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक चेअरमन तथा पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६ सप्टेंबर रोजी मनकर्णिका लॉन्स, पारनेर येथे संपन्न झाली.

यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे, संचालक बाळासाहेब सोबले, रखमाजी कापसे, लक्ष्मण डेरे, मयूर गांधी, अर्जुन गाजरे, राजेंद्र औटी, कृष्णा उमाप, सुभाष राठोड, दिलीप दाते, सुनील गाडगे, सुंदा दाते व आशा तराळ तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, शिक्षण महर्षी डॉ.वाय.पाटील व अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

संस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ३ कोटी ३ लाख १२ हजार ६१७ रुपयांचा निव्वळ नफा व ऑडिट वर्ग 'अ' मिळाल्याबद्दल मा. चेअरमन काशिनाथ दाते यांनी सभेत माहिती दिली.

संस्थेची बँक गुंतवणूक १०४ कोटी असून, स्थावर मालमत्ता ३ कोटी ५४ लाख आहे. संस्थेमार्फत सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभासदांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व व्यवसायासाठी १७५ कोटी रुपये कर्ज वितरित केले आहे.

संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्हा कार्यक्षेत्र असून संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, बेलवंडीफाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा, सुपा, कामोठे, अहिल्यानगर, वनकुटे, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा सुरू आहेत.

संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, आळेफाटा, शिरूर व सुपा येथे स्वमालकीच्या इमारती आहेत. संस्थेने पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, सुपा, बेलवंडी फाटा, जामगाव, ढवळपुरी येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले व सभा खेळीमेळीत संपन्न झाली. सभेचे सूत्रसंचालन रखमाजी कापसे सर यांनी केले. व्हा.चेअरमन सुरेश बोरुडे सर यांनी आभार मानले. यावेळी सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभा संपल्यानंतर संस्थेमार्फत सभासदांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

# पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात खापरखेडा औष्णिक केंद्रातील बाप्पाला भावपूर्ण निरोप



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** १२ दिवस मनोभावे केलेल्या पूजा-अर्चनेनंतर खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या ५०० मेगावॅट सीएचपी विभागातील लाडक्या गणरायाला २५ सप्टेंबर रोजी अत्यंत भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने संपूर्ण विसर्जन मिरवणुकीत चैतन्य निर्माण केले होते.

विविध रंगीबेरंगी फुलांनी सजवलेल्या आकर्षक वाहनातून गणरायाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विद्युत केंद्राचे अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बाप्पाच्या भक्तीत तल्लीन होऊन सर्वांनी मिरवणुकीचा आनंद लुटला, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

ही विसर्जन मिरवणूक खापरखेडा येथील कोलार नदी घाटावर पोहोचल्यानंतर बाप्पाची विधिवत महाआरती व पूजा करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांच्या डोळ्यांत साश्रू नयन आणि ओठांवर पुढच्या वर्षी लवकर याचा गजर असताना बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

या गणेशोत्सवाच्या निमित्ताने अधिकारी, कर्मचारी आणि कामगार यांच्यातील परस्पर स्नेह, एकजूट आणि सामाजिक सलोखा प्रकर्षाने अधोरेखित झाला. विसर्जन मिरवणुकीत अधीक्षक अभियंता प्रशांत भट, लोकेश फुटाने, संदीप येवले, गणेश लांडे, डडमल साहेब, धनंजय पिंपळकर, बेलापुरकर साहेब, रामकृष्णा कुंभरे, ज्ञानेश्वर घोंगे, नितीन कांबळे, ज्ञानेश्वर डहाके, समाधान मिसाळ, एस. वाणी, रोशन मोरे, रवी जाधव, सतीश खरबीकर, अनिल निश्चळ, सुनील कोल्हारे, देविदास ननावरे, देवेंद्र बुरबादे, मनीष परिहार, दिनेश कुंबडे, कैलास मसराम, कैलास जुमळे, दिनेश नाकाडे, प्रशांत भोयर, सुनील मोवाडे, पीयुष बिसाने, प्रवीण मानकर, महेंद्र गजभिये यांच्यासह विद्युत केंद्रातील बहुसंख्य कर्मचारी व भाविक उपस्थित होते.

# धनोजे कुणबी समाजाच्या एकजुटीसाठी केंद्रीय समितीचा पुढाकार

## केंद्रीय अध्यक्ष संजय ढवस यांच्या उपस्थितीत पार पडली पुण्यात महत्त्वपूर्ण बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाजाला संघटित व सक्षम करण्याच्या उद्देशाने धनोजे कुणबी समाज केंद्रीय समितीच्या पुढाकारातून पुणे येथे समाजाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर रोजी केंद्रीय समितीचे अध्यक्ष संजय ढवस यांच्या उपस्थितीत पार पडली. समाजातील विविध मंडळांना केंद्रीय समितीच्या माध्यमातून एका व्यासपीठावर आणणे, समाजाची संघटनात्मक ताकद वाढविणे तसेच युवकांसाठी रोजगार व उद्योगाच्या नव्या संधी निर्माण करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी धनोजे कुणबी समाज केंद्रीय समितीचे अध्यक्ष तसेच चंद्रपूर धनोजे कुणबी समाजाचे उपाध्यक्ष संजय ढवस, केंद्रीय समितीचे सदस्य प्रा.रवींद्र झाडे यांचे पुणे येथील धनोजे कुणबी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी पुणे येथील धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष राहुल धानोरकर, उपाध्यक्ष किशोर टोंगे, सचिव अमित कुरेकर, ॲड. मनीष ढेंगळे तसेच रमेश निखाडे यांच्यासह समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**समाजाच्या सर्व मंडळांना एकत्र आणण्यावर भर**

धनोजे कुणबी समाजातील विविध मंडळे, संस्था आणि पदाधिकाऱ्यांना एकत्र आणून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक संघटन उभारण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. केंद्रीय समितीच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करून सामाजिक प्रश्नांवर सामूहिकपणे काम करण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

**युवकांच्या रोजगाराचा मुद्दा केंद्रस्थानी**

समाजातील युवकांना शिक्षणानंतर रोजगाराच्या उपलब्ध संधी, कौशल्यविकास, स्वयंरोजगार आणि उद्योगाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला. युवकांसमोरील अडचणी समजून घेऊन त्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक सहकार्याची यंत्रणा उभारण्यावर भर देण्यात आला.

**शेती आधारित उद्योगांना चालना देण्याची गरज**

धनोजे कुणबी समाजाचा मोठा वर्ग शेतीशी जोडलेला असल्याने शेती पूरक व शेती आधारित उद्योगांना चालना देण्याबाबतही सखोल चर्चा झाली. शेतमाल प्रक्रिया, मूल्यवर्धन, लघुउद्योग आणि उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ समाजातील तरुण व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने पुढील काळात प्रयत्न करण्याबाबत विचार मांडण्यात आले.

**केंद्रीय समितीला पुणे मंडळाचे सहकार्य**

समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी आणि धनोजे कुणबी समाजाला अधिक संघटित करण्यासाठी धनोजे कुणबी समाज केंद्रीय समितीच्या उपक्रमांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन पुणे येथील समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिले. समाजहिताच्या विविध उपक्रमांसाठी भविष्यातही परस्पर समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

समाजाची एकजूट, युवकांचे सक्षमीकरण आणि आर्थिक प्रगती या त्रिसूत्रीवर केंद्रीय समितीच्या माध्यमातून पुढील काळात व्यापक काम उभे करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# पनवेलमध्ये ६ हजार ९७३ गणरायांना भावपूर्ण निरोप

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, पनवेल (नवी मुंबई) :** महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर तसेच नावडे उपविभागात दहा दिवसांच्या ६ हजार ९७३ घरगुती व सार्वजनिक गणरायांचे भक्तिमय वातावरणात शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने विसर्जन करण्यात आले. 'माझी वसुंधरा ७.०' अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी महापालिकेने 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' ही मोहीम राबविली. महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध विभागांनी समन्वयाने नियोजन केले होते.

महापालिकेने शहरात एकूण १०६ ठिकाणी गणेश विसर्जनाची व्यवस्था केली होती. त्यामध्ये ७७ नैसर्गिक विसर्जनस्थळे आणि २९ कृत्रिम तलावांचा समावेश होता. विसर्जनस्थळी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटीव्ही, निर्माल्य कलश, लाइफ जॅकेट तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच आयुक्त मंगेश चितळे यांनी विविध विसर्जनस्थळांना भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली.

विसर्जन सोहळा सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, अग्निशमन दल, आरोग्य व स्वच्छता कर्मचारी, पोलीस प्रशासन, विविध स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांनी समन्वयाने काम केले. विसर्जनस्थळी प्राथमिक उपचाराची ही व्यवस्था करण्यात आली होती.

## थोडक्यात बातम्या

### राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार लोणंदच्या वैचारिक चळवळीस प्रेरणादायी - शिवाजीराव शेळके



**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.२६, लोणंद (सातारा) :** प्रा.अमीर इनामदार यांना जाहिर झालेला राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार-२०२६ लोणंद नगरीच्या शैक्षणिक-वैचारिक वैभवात भर पडणारा आहे, असे गौरवोद्गार खंडाळा सहकारी साखर कारखाना संचालक तथा लोणंद नगरपंचायत बांधकाम सभापती, गटनेते शिवाजीराव शेळके पाटील यांनी काढले. आज २५ सप्टेंबर रोजी प्रा.इनामदार यांना पुरस्कार जाहिर झालेबद्दल त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यात आल्या.

युवा नेते असगर इनामदार म्हणाले-अमीर हे हरहुन्नरी व्यक्तिमत्व असून ज्ञानदानासोबतच विद्यार्थी विचार-आचाराने घडविण्यासाठी सदैव धडपडत असतात याचा आम्हाला अभिमान आहे. नगरसेवक भरत बोडरे म्हणाले-प्रा.अमीर इनामदार यांच्यावर त्यांच्या आई-बाबांचे सुसंस्कृत संस्कार आहेत त्यामुळे ते पुरस्कारास पात्र आहेत. युवा नेते वैभव (बंटी) खरात म्हणाले-अमीर इनामदार प्रबोधन चळवळीतील युवकांचे संघटन करणारे व्यक्तिमत्व आहे. राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार म्हणजे लोणंदकरांसाठी अभिमान आहे. यावेळी युवामित्र मुस्तफा पटेल भाई, प्रा. इनामदार यांचे वडील सेवानिवृत्त कार्यालयीन अधिक्षक सलीम इनामदार आणि इनामदार कुटुंबीय उपस्थित होते.

### सामाजिक बांधिलकी जपत मोरया ग्रुपचा उपक्रम



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** सामाजिक बांधिलकी जपत मोरया ग्रुप भानेगावचा राजा गणेशोत्सव मंडळ, भानेगाव, खापरखेडा यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात खापरखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेते, उपविजेते तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बालगोपालांना चषक व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

यावेळी आयोजित चित्रकला स्पर्धेला बालगोपालांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुलांनी आपल्या कल्पकतेचा व कलागुणांचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. त्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उपस्थितांनी कौतुक केले. दरम्यान, मोरया ग्रुप व व्हिजीए ॲकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच १२ वर्षांखालील मुला-मुलींसाठी क्रिकेट प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेटविषयी मुलांचे ज्ञान वाढविणे, त्यांच्यात वाचन व सामान्यज्ञानाची आवड निर्माण करणे तसेच मोबाईलच्या अतिवापरापासून त्यांना विविध उपक्रमांकडे वळविणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. क्रिकेट प्रश्नमंजुषा स्पर्धेत आदित्य पांडव याने प्रथम, प्रियल मनेहिने द्वितीय, तर साई भोयर, पार्थ चौधरी, श्री.पांडे, नतांशु बर्वे आणि सात्विक बोंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विशेष गौरव मिळविला. सोहम रंगारी व हिमांशु सोनकुसरे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

बालगोपालांच्या कलागुणांना, ज्ञानाला व क्रीडा क्षेत्रातील आवडीला प्रोत्साहन देण्यासाठी मोरया ग्रुपच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे पालक व नागरिकांनी कौतुक केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच सामाजिक, शैक्षणिक व संस्कारक्षम उपक्रम राबविण्याचा मोरया ग्रुपचा प्रयत्न या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोरया ग्रुपच्या सर्व पदाधिकारी, सदस्य, स्वयंसेवक तसेच पालकांनी सहकार्य केले.

### गणपती विसर्जनाला गालबोट !

### गोदावरीत बुडालेल्या पालमच्या दोन तरुणांचा दुर्दैवी अंत

**एनडीआरएफच्या शोधमोहिमेत मृतदेह सापडले**



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२६, पालम (परभणी) :** गणपती विसर्जनाच्या उत्साहाला गुरुवारी, दि. २५ सप्टेंबर रोजी दुर्दैवी घटनेने गालबोट लागले. पालम शहरातील जय मल्हार गणेश मंडळाच्या गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यासाठी धानोरा येथील गोदावरी नदीपात्रात गेलेल्या दोन तरुणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने पालम शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून, घोरपडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पालम शहरातील जय मल्हार गणेश मंडळाच्या वतीने गणेशमूर्तीची मिरवणूक काढून विसर्जनासाठी धानोरा येथील गोदावरी नदीपात्रात नेण्यात आली होती. गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास विसर्जनाची प्रक्रिया सुरू असताना गजानन रामदास घोरपडे (वय २०) आणि मुंजाजी अश्रूबा घोरपडे (वय १७) हे दोघे नदीपात्रात बुडाले.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने शोधमोहीम सुरू केली. एनडीआरएफच्या पथकाने गोदावरी नदीपात्रात शोधमोहीम राबवून दोन्ही युवकांचे मृतदेह शोधून बाहेर काढले. त्यानंतर दोन्ही मृतदेह ग्रामीण रुग्णालय, पालम येथे आणण्यात आले. तेथे उत्तरिय तपासणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

गणपती विसर्जनाच्या आनंदाच्या वातावरणात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे पालम शहरावर शोककळा पसरली आहे. दोन तरुणांचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने शहरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.